जगभर

काराझिकवरच्या खटल्याचा अन्वयार्थ

चन्द्रशेखर पुरन्दरे

२१ जुलैला रादोवान काराझिक या पूर्वीच्या युगोस्लावियाच्या एका नेत्याला बेलग्रेडमध्ये अटक करण्यात आली. तो तेरा वर्षे फरारी होता आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे वॉरंट जारी होते. आता मानवतेविरुद्धचे गुन्हे आणि वांशिक नरसंहार या आरोपांवरून त्याच्यावर आंतरराष्ट्रीय न्यायालयावर खटला चालविण्यात येईल.

९० च्या दशकात धर्म, वंश, पंथ या घटकांवर युगोस्लावियाचे विघटन होऊ लागले. अलिप्तता चळवळीचा भारताबरोबर संस्थापक असणारा, निराळ्या प्रादेशिक अस्मितांवर आधारित हा देश. आजमितीला त्यातून फुटून सात देश निर्माण झाले आहेत. हे विघटन प्रत्येक वेळी अहिंसक, वैधानिक मार्गाने झाले नाही; त्यात मोठा हिंसाचारही झाला. ख्रिश्चन विरुद्ध मुस्लिम, सर्ब विरुद्ध क्रोट अशी अनेक युद्धे झाली. अराजक माजले. मग पश्चिम युरोप आणि अमेरिका यांच्या NATO या लष्करी संघटनेने सैन्य पाठवून परिस्थिती काबूत आणली. आता नव्याने अस्तित्वात आलेल्या देशांना युरोपियन संघटनेत सामील करून घेण्याची प्रक्रिया चालू झाली आहे.

१९९२ ते १९९५ च्या दरम्यान बोस्निया या प्रांतात मोठी यादवी झाली. तेथील सर्ब लोकांनी इतर लोकांना हुसकावून लावण्यासाठी अत्याचार केले. पश्चिमेच्या मते जवळजवळ दोन लाख लोक या हिंसेत बळी पडले तर वीस लाख देशोधडीला लागले. त्यात मुस्लिमांची संख्या प्रचंड होती. हे आकडे विवाद्य आहेत, अतिशयोक्त आहेत असे सर्ब लोकांचे म्हणणे. त्यांच्या मते आधी सर्ब मारले गेले मग प्रत्युत्तर म्हणून मुस्लिम मारले गेले. (ते शेकड्यात, लाखांत नव्हे). या वादाला अंत नाही.

काराझिक हा या सर्ब लोकांचा त्यावेळचा नेता. NATO च्या आक्रमणानंतर तो भूमिगत झाला व आता पकडला गेला. त्याच्या आधी मिलोसेविच हा युगोस्लावियाचा आधीचा अध्यक्षही अशाच आरोपांवरून द हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या तुरूंगात होता. त्याच्यावर खटला चालू असतानाच तो मरण पावला. त्याचा मृत्यू पश्चिमेला सोईचा होता कारण या हत्याकांडामागे पश्चिमेचा हातभार कसा होता याचे पुरावे तो पुढे आणत होता.

या संदर्भात दोन मुद्दे लक्षात घेण्यासारखे आहेत. मानवतेविरुद्ध गुन्ह्यांबद्दल कोणत्याही देशाच्या (बहुधा माजी) सत्ताधीशाविरुद्ध आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला चालवता येतो. तत्त्वत: जगातल्या कोणत्याही देशाच्या नागरिकांविरुद्ध होणाऱ्या अत्याचाराचे परिमार्जन होण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे. पण प्रत्यक्षात कोणत्या सत्ताधीशाला किती जबाबदार धरायचे आणि न्यायालयासमोर खेचायचे याचा निर्णय आंतरराष्ट्रीय सत्ता समीकरणे त्या-त्या वेळी ठरवतात. म्हणजे, इराकवर युद्ध लादले आणि काही लाखांत इराकी लोकांची हत्या केली म्हणून अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष किंवा ब्रिटनचा पंतप्रधान आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर आरोपी म्हणून उभे राहणे असंभवनीय आहे. अर्थात दुबळ्या राष्ट्रांचे सत्ताधीश आपल्याच जनतेविरुद्ध अत्याचार करतात, याची उदाहरणे जगात कमी नाहीत. त्यांचे गुन्हे कधीही असमर्थनीयच पण हे ठरविण्याचा निखळ, नैतिक अधिकार आज जगात कोणत्याच संस्थेला नाही. त्यात, हे स्थानिक हुकूमशहा मोठे होतात ते पश्चिमेच्या त्यावेळच्या पाठिंब्यामुळे. इराणचा शहा, इराकचा सद्दाम हुसेन, पनामाचा नोरिगा यांना लष्करी सामर्थ्य देण्यात पश्चिमेचा मोठा हातभार होता. त्या सौहार्दाच्या काळात मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांकडे पश्चिम दुर्लक्ष करते. पाकिस्तानात हेच दिसून आले. मात्र राजकारणाची दिशा बदलली की हेच सत्ताधीश पदच्युत केले जातात व आता आरोपी म्हणून जागतिक न्यायालयापुढे आणले जातात. विशेषत: पूर्वीच्या युगोस्लावियाच्या अशा अन्यायाची तपासणी करणारे सध्याचे न्यायालय NATO नेच निर्माण केले. त्यामुळे त्याच्या निष्पक्षपातीपणाबद्दल संदेह राहतो.

काराझिकच्या अटकेमागचे दुसरे राजकीय कारण म्हणजे तो मुस्लिमांचा बळी घेणारा दैत्य अशी प्रतिमा पश्चिमेच्या राजकारण्यांनी आणि प्रसारमाध्यमांनी उभी केली आहे. त्याला न्यायालयासमोर आणणे हा मुस्लिम अनुनयाच्या देखाव्याचा महत्त्वाचा भाग आहे. अफगाणिस्तान, इराक युद्धापासून पश्चिमेत कमालीचे मुस्लिमविरोधी वातावरण आहे. अशा वेळी काराझिकच्या मुस्लिमविरोधी मोहिमेला ख्रिश्चन पश्चिमेनेच आळा घातला हे लोकांसमोर आणणे याचे मोठे राजकीय भांडवल करता येते.

तात्पर्य, काराझिकवरचा खटला मिलोसेविचच्याच मार्गाने जाऊ शकतो. काराझिक कसाई असेलही पण तो तसा होता हे ठरवणाऱ्या शक्तींचे स्वत:चे हात स्वच्छ नाहीत.